Open Access
IJASSH
International Journal of Arts, Social Sciences and Humanities
(A Quarterly, Refereed, & Peer Reviewed International Journal)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://ijassh.aaassher.org/
ISSN (Online): 2584-1130
Volume 1, Issue 1, March 2023; Pages 10-13
DOI: 10.5281/zenodo.8210927

Original Research Article

# ब्रिटिश इतिहासकारांचा साम्राज्यवादी लेखन परंपरा : एक अभ्यास

मधुकर खंडू पवार
गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय, कोल्हापूर
*Corresponding author E-mail:* madhukarpawar593@gmail.com

Received: 19 February, 2023 | Accepted: 15 March, 2023 | Published: 18 March, 2023

## प्रस्तावना

अठराव्या शतकाच्या शेवटी शेवटी भारताच्या बहुतांश भागांमध्ये ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता प्रस्थापित झाली होती. त्यामुळे संपूर्ण भारतावर आपले वर्चस्व प्रस्थापित करून ते दृढमूल करण्याच्या दृष्टीने इंग्रजांच्या साम्राज्यवादी आकांक्षा वाढली वाढीस लागल्या. आपली सत्ता दीर्घकाळ राहावी यासाठी भारतीय लोक इंग्रजांची सत्ता बिनविरोध मान्य करतील अशी उपाययोजना करणे इंग्रजांना आवश्यक वाटत होते. केवळ शस्त्राच्या बळावर अशाप्रकारचे वर्चस्व दीर्घकालिक राहू शकत नाही याची जाणीव इंग्रजांना झाली.

त्यामुळे भारतीय वरील इंग्रजांच्या सत्तेला तार्किक आधार देणे गरजेचे होते. हा तात्विक आधार इंग्रजांना भारतीयांच्या तुलनेत श्रेष्ठ ठरवत नेत्यांना भारतावर सत्ता गाजवण्याचा नैतिक अधिकार असल्याचे ठासुन सांगणारा नवा सिद्धांतम्हणजेत साम्राज्यवादाचा ब्रिटिश टीचर्स कारणे शोधून काढला भारतीय समाज हा मागासलेला गती हिन रानटी समाज आहे बौद्धिक आणि शास्त्रीय भौतिक प्रगतीमुळे इंग्लंड एस श्रेष्ठ व प्रगत राष्ट्र बनले आहे. भारतासारख्या मागासलेल्या देशात कायद्याचे राज्य आणायचे असेल तर प्रशासनात पाश्चात्य शिक्षणाच्या आधारे अशी शिक्षण व्यवस्था निर्माण करावयास हवी असा सिद्धांत मांडला. इंग्लंड हे प्रगत आणि सुसंस्कृत राष्ट्र असल्यामुळे भारतासारख्या मागासलेल्या समाजाला सुसंस्कृत करणे आणि त्यांच्या उत्थानाचे कार्य ईश्वराने इंग्रजांवर सोपविले आहे अशा प्रकारच्या ग्राहकाच्या आधारे भारतीयांना इंग्रजाच्या तुलनेत कनिष्ठ ठरविले इंग्रजांच्या श्रेष्ठत्वाच्या आधारावर त्यांच्या भारतावरील

सत्तेला नैतिक अधिष्ठान देण्याचे कार्य ज्या ब्रिटिश साम्राज्यवादी लेखन इतिहासकाराने केले. त्याचा प्रस्तुत आढावा थोडक्यात शोधनिबंधामध्ये घेण्यात आलेला आहे.

**महत्वाचे शब्द:** ईस्ट इंडिया कंपनी; जेम्स मील; हिस्ट्री ऑफ ब्रिटिश इंडिया; हेनी इलियट; माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन; ग्रँड डफ; जेम्स टाड

## जेम्स मिल

लंडनमध्ये ईस्ट इंडिया कंपनी मध्ये पत्रव्यवहार तपासणीस म्हणून काम करणाऱ्या जेम्स मिल यांनी भारताला प्रत्यक्ष कधी भेट न देता भारताचा इतिहास लिहिला. कंपनीच्या भारता संबंधीच्या पत्रव्यवहार वरून जेम्स मिल चा भारता संबंधित दृष्टिकोन बदलला होता. पूर्वीचे इतिहास कार, ख्रिश्चन मिशनरी यांनी लिहिलेल्या माहितीच्या आधारे जेम्स मिलेने १८२६ हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया या शीर्षकाचा ग्रंथ सहा खंडांमध्ये प्रकाशित केला.जेम्स मिल च्या या ग्रंथाला इंग्लंडमध्ये मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळाली. भारतावरील ब्रिटिश सत्तेच्या प्र स्थापनेचे तात्विक समर्थन असल्यामुळे आणि भारता संबंधी विश्वासनीय ग्रंथ असल्यामुळे कंपनीच्या अधिकाऱ्यांसाठी या ग्रंथाचे वाचन आवश्यक मानले गेले. जेम्स मिल याला साम्राज्यवादी इतिहास लेखनाचा जनक आणि त्याच्या ग्रंथाला ब्रिटिश साम्राज्यवादाचे बायबल मानले जाते.[१]

साम्राज्यवादी विचाराने प्रभावित झालेल्या जेम्स मिळणे वर उल्लेखलेल्या ग्रहित का च्या आधारावर भारतीयाच्या मागासलेपणाची ऐतिहासिक मांडणी करत भारतावरील ब्रिटिश सत्तेचे समर्थन केले जेम्स मिल ने भारताच्या इतिहासाचे काल विभाजन हिंदू काळ मुस्लिम कार्ड आणि ब्रिटीश काळ अशी धार्मिक आधारावर केली यामुळे भारताच्या इतिहासाची धार्मिक आधारे काल विभाजनाची प्रथा पडली आणि यातच भारताच्या जमातवादी इतिहास लेखनाची मुळे सापडतात. जेम्स मिल ने आपल्या ग्रंथात प्राचीन भारतीय संस्कृती आणि हिंदूची निंदानालस्ती केली हिंदूना मागास ठरून मुसलमानांना त्यांच्या पेक्षा श्रेष्ठ ठरविले. आणि त्यातून ब्रिटिश अधिकाऱ्याच्या अनेक पिढ्या मिलच्या साम्राज्यवादी विचारसरणीवर वंश श्रेष्ठ तत्वाची विचारसरणी अंगीकारली गेली.[२]

## हेनी इलियट

जेम्स मिल यांनी आपल्या ग्रंथात प्राचीन भारतीय संस्कृती आणि हिंदूची निंदानालस्ती केली. आणि त्यांच्या इतिहासाला विकृत स्वरूप देत मुस्लिमांना त्यांच्या पेक्षा श्रेष्ठ ठरविले. जेम्स मिलच्या अगदी उलट चित्र इलियट आणि त्याचा सहलेखक जान डाऊन सन यांनी रंगविले ईस्ट इंडिया कंपनीत नोकरी असलेला इलियट मी मी फारशी भाषा चा अभ्यास करून. मुस्लिम शासन काळातील इतिहासाच्या ग्रंथाचे हस्तलिखिते एकत्रित करून त्याचे भाषांतर केले. इलेक्ट्री ही भाषांतरे History of India as Told by its own historians या शीर्षकाखाली प्रकाशित केले.[३] या कामात लंडन येथील प्राध्यापक जान डाऊन सन यांनी त्याला सहाय्य केले.

या ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्यांनी भारतीय मुस्लिम शासकांना जुलमी अत्याचारित ठरविले. त्यांना कायद्याच्या राज्याची संकल्पना माहीत नसल्याचे प्रतिपादन इलियट केले. त्यामुळे भारताला पहिल्यांदाच न्यायप्रिय व निपक्षपाती शासक इंग्रजांच्या रूपात आली असून भारतात कायद्याचे राज्य निर्माण करण्याची ऐतिहासिक कार्य ब्रिटिश प्रशासन करत आहे असा निष्कर्ष इलियट ने काढला. इंग्लंडच्या अशाप्रकारच्या मांडणीमुळे ब्रिटिश नोकरशाहीत आत्म श्रेष्ठत्वाची भावना वाढीस लागली.[४]

**माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन**

मुंबई प्रांताचा गव्हर्नर म्हणून काम केलेल्या एलिफंट चा दृष्टिकोन जेम्स मिल पेक्षा थोडासा भिन्न होता. प्रत्यक्ष भारतात काम करून मिळालेला अनुभव आणि पौर्वात्य वादी इतिहासकाराच्या ग्रंथाचा अभ्यास केल्यामुळे जेम्स मिलच्या मांडणीशी माऊंट स्टुअर्ट यांचे मतभेद होते. जेम्स मिल चे लिखाण वस्तुनिष्ठ नसून प्राचीन भारतीयांचे योग्य मूल्यमापन केले नसल्याची टीका एलिफंट केली. इंग्लंडला परतल्यानंतर १८४१ त्यांनी History of Hindu and Muhammadan India या शीर्षकाचा ग्रंथ लिहून प्रकाशित केला.[५]

भारताच्या राजकीय इतिहासापेक्षा सांस्कृतिक इतिहासावर भर देऊन भारतातील शासन व्यवस्था, समाजव्यवस्था, चालीरीती धर्म साहित्य, तत्त्वज्ञान, कला, व्यापार, उद्योग इत्यादी विषयावर त्यांनी लेखन केले.[६]

भारता संबंधी प्रतिकूल दृष्टिकोन न बाळगता सहानुभूतीपूर्वक आणि उदारमतवादी दृष्टिकोनातून भारताचा इतिहास लिहिला असला तरी भारतावरील ब्रिटिश शासनाची आवश्यकता असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

**ग्रँड डफ आणि जेम्स टाड**

ग्रँड डफ आणि जेम्स टाड :एलिफंट याच्या हाताखाली काम केलेल्या डफ आणि टाड यांच्यासारख्या अधिकाऱ्याच्या इतिहास लेखनावर माऊंट स्टुअर्ट विचाराचा प्रभाव दिसून येतो. साताऱ्यामध्ये रेसिडेंट म्हणून काम करणाऱ्या ग्रँड डफ ने बखर, कैफियत सारख्या मराठ्यांच्या इतिहासाची लिखित साधने गोळा करू त्याआधारे History of the Marathas हा ग्रंथ दोन खंडात लिहून प्रकाशित केला.[७]

सर जेम्स टाड ने Annals an and Antiquities of Rajasthan या ग्रंथात राजपूत चा इतिहास मूळ साधनाच्या आधारे लिहिला.[८]

**निष्कर्ष**

भारतावरील ब्रिटिश सत्ता दीर्घकाळ स्थापन करण्यासाठी ब्रिटिश साम्राज्य वादाचे तात्विक समर्थन करण्याच्या प्रक्रियेतून साम्राज्यवादी इतिहास लेखन परंपरा विकसित झाली. भारतीयांच्या बाबतीत द्वेषपूर्ण आणि विषमता पूर्वक दृष्टिकोन ठेवून भारतीय इतिहासाचे चुकीचे लेखन करण्यात आले. साम्राज्यवादी इतिहासकारांनी ऐतिहासिक साधनाचा वापर करत आधुनिक पद्धतीने इतिहास लेखन केले. त्यामुळे त्यांनी मांडलेली मते मोठ्या प्रमाणात विश्वासनीय मांडली

गेली. आणि भारतीयाच्या मागासलेपणाचा मांडणीचा प्रभाव नवशिक्षित भारतीयाच्या सुरुवातीच्या पिढीवर पडून भारतीय संस्कृती विषयी अपराधीपणाची भावना भारतीयांमध्ये निर्माण झाली.

अशा प्रकारच्या चुकीच्या इतिहासाच्या मांडणीमुळे हिंदू-मुस्लीम दुहीची बीजे भारतीयांमध्ये निर्माण झाले आणि आपला पराभवाचा इतिहास आहे असे मत भारतीयाचे निर्माण झाले. याचा दीर्घ काळ प्रभाव आजही भारतीयांच्या मनामध्ये दिसून येतो.

**संदर्भ सूची**

१. प्रभाकर देव : इतिहास संशोधन, अध्ययन आणि लेखन परंपरा, बेना टिक प्रकाशन नाशिक २००७

२. शांता कवठेकर : इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर २००५

३. बी. एन. सरदेसाई : इतिहास लेखन शास्त्र, फडके प्रकाशन कोल्हापूर, २००२

४. जास्वंदी वाबुकर : इतिहासातील नवे प्रवाह डायमंड पब्लिकेशन पुणे, २०१४

५. इतिहास लेखन मीमांसा, निवडक समाज प्रबोधन पत्रिका, खंड - १ लोकवांडमय गृह २०१०

६. B. Sheikh Ali History : Its Theory and method, Macmillan, 1978